**प्रेस नोट**

**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगाव**

**दि.१८/०२/२०२५**

**आरोपी अविनाश सदाशीव सनंसे ,वय ४९ वर्षे , रा.प्लॉट नं.५८, शास्त्री नगर ,(रामानंद नगर )जळगाव (खाजगी इसम) यांनी १,०००/- रु. लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बावत**

----------------------------------------------000----------------------------------------------

यातील फिर्यादी यांना त्यांचे आजोबा कै.पौलाद पाटील यांचे नावे व्यंकटेश कॉलनीत असलेल्या प्लॉटवर वारस लावण्याचे, हक्कसोड करण्याचे व कर्जाचा बोजाची नोंदी सिटी सर्वेच्या उताऱ्यावर लावुन पाहिजे होत्या. सदर कामाची चौकशी करण्यासाठी फिर्यादी हे दि.०५.०२.२०२५ रोजी जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयात गेले होते. तेव्हा त्यांची तेथे संगणकावर बसुन काम करणारे आरोपी खाजगी इसम अविनाश सनंसे यांचेशी भेट झाली. त्यांनी फिर्यादीस स्वत:ची ओळख डेटा एंन्ट्री ऑपरेटर अशी करुन दिली होती. त्यांनतर फिर्यादी यांनी त्यांचे कामा संदर्भात खाजगी इसम सनंसे यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी फिर्यादीस अर्ज व त्यासोबत कागदपत्रे जोडुन ती सदर कार्यालयातील आवक जावक शाखेत जमा करण्यास सांगुन,सदरचे काम नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील साहेबांकडुन करुन आणुन देण्यासाठी स्वत:साठी फिर्यादीकडे १५००/—रुपये व इतर नोंदी घेण्यासाठी देखील पैसे द्यावे लागतील असे सांगीतले होते.

त्याप्रमाणे दि.०६.०२.२०२५ रोजी फिर्यादी यांनी त्यांचा अर्ज व त्यासोबत कागदपत्रे जोडुन ती सदरची कागदपत्रे ही त्यांचा भाऊ आनंद पाटील यांचे मार्फतीने जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील आवक—जावक शाखेत दिले होते. त्यानंतर फिर्यादी यांनी दि.१५.०२.२०२५ रोजी त्यांचे कामासंदर्भात खाजगी इसम सनंसे यास विचारपुस करण्यासाठी फोन केला होता. परंतु फिर्यादी यांनी त्यांना १५००/—रुपये दिले नाही म्हणुन त्यांनी फिर्यादीचे काम करण्यास नकार दिला होता. सदर लाच मागणी प्रकारा बाबत फिर्यादी यांनी दि. १८.०२.२०२५ रोजी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर तक्रारीची १८.०२.२०२५ रोजी ला.प्र.वि.जळगाव येथील सापळा पथकाने पडताळणी केली असता आरोपी खाजगी इसम सनंसे यांनी फिर्यादी यांचे आजोबा कै.पौलाद पाटील यांचे नावे व्यंकटेश कॉलनीत असलेल्या प्लॉटवर वारस लावण्याचे, हक्कसोड करण्याचे व कर्जाचा बोजाची नोंद अशा तिन प्रकारच्या नोंदी लावण्याचे काम जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील साहेबांकडुन करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात त्यांचेकरिता प्रत्येक नोंदीचे ५ हजार रुपये १५०००/—रुपये लाचेची मागुन, कामाची सुरवात करण्यासाठी स्वत:करिता १५००/—रुपये लाच रकमेची मागणी करुन, त्यापैकी १०००/—रुपये लाच रक्कम स्वत: आज रोजी १७.३० वाजेचे सुमारास जळगाव नगर भुमापन कार्यालयात पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.भारत तांगडे ,पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा.श्री.माधव रेड्डी ,अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन पुढील तपास श्री.योगेश जी.ठाकूर ,पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.जळगाव करीत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगाव तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगाव कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहीजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दुरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी लँडलाईन ते लँडलाईन व मोबाईल ते लँन्डलाईन अशी टोल फ्रि नं. १०६४ ची सेवा सुरु करण्यात आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली संबंधी व करावयाच्या तक्रारी संधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अ.नं. | युनिटचे नाव | दुरध्वनी क्रमांक | टोल फ्रि नंबर |
|---|---|---|---|
| १ | जळगाव | ०२५७ - २२३५४७७ | १०६४ |
| २ | नाशिक | ०२५३ - २५७५६२८ , २५७८२३० | १०६४ |
| ३ | अहमदनगर | ०२४१ - २४२३६७७ | १०६४ |
| ४ | धुळे | ०२५६२ - २३४०२० | १०६४ |
| ५ | नंदुरबार | ०२५६४ - २३०००९ | १०६४ |

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

योगेश जी. ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव